# महा कर्मयोगी

महातीर्थ यात्री अनासक्त जोगी ।
असा पाहिला मी महा कर्मयोगी ॥
झरा करुणेचा मन नितळ आरस्पानी ।
गांजल्यांना उठविले तू आधार देऊनी ॥
जाणीले तयाने अंतरंग उपेक्षितांचे ।
तृप्त केले जन मन, तृषार्त-क्षुधितांचे ॥
आप्त स्वकीयांनी जया दूर लोटले हो ।
नीज हृदयाशी तया कवटाळीले हो ॥
प्रथम पाहिला कुष्ठरोगी, पडला कडेला ।
पाझर मनाच्या उचंबळोनी आला ॥
ना वळूनी पाहिले मागे, ना कुठेही थांबला ।
ना समाज भयाच्या ना प्रतिष्ठेच्या विचार केला ॥
सुख दुःखाची सहचारिणी, खरी अर्धांगिनी ती ।
ना डगमगली, ना मागे फिरली, खरी धैर्यशालीनी ती ॥
मार्ग खडतर जीवनाचा कष्ट अपरंपार ।
परि उत्तुंग ध्येयासक्ती अभंग निर्धार ॥
विश्वास जागविला, आत्मनिर्भर केले, आनंदवन निर्मिले ।
वंचितांच्या जीवनी स्वर्गीय नंदनवन फुलविले ॥
काळ चालतो युगानुयुगे, तेव्हा असा कर्मयोगी जन्मतो ।
याच रुपाने तो योगेश्वर पुन्हा जगी अवतार घेतो ॥




सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर कोथरूड पुणे
9405438939